वर्ष : ०६ | अंक: ११ | मुंबई, मंगळवार ४ फेब्रुवारी २०२० ते सोमवार १० फेब्रुवारी २०२० | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब


PG 2 सिग्नलवरील 'हॉर्नहौसे'ला आता खोळंब्याची शिक्षा

3 → आजारी रुग्णालये

वीज मीटर प्रीपेड होणार ← 4

# महाराष्ट्राचा मुख्यमंत्री बनणं हे माझं स्वप्न कधीच नव्हतं

**मुंबई : देशभरात नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला तीव्र विरोध होत असताना, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या कायद्याला पाठिंबा दिला आहे. त्याचवेळी राज्यात एनआरसी लागू होऊ देणार नाही, अशी रोखठोक भूमिकाही त्यांनी घेतली. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेचं मुखपत्र असलेल्या 'सामना'ला दिलेल्या मुलाखतीत नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणि एनआरसीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. नागरिकत्व दुरुस्ती कायद्यामुळं देशातील कोणत्याही नागरिकाचं नागरिकत्व हिरावून घेतलं जाणार नाही. मात्र, महाराष्ट्रात एनआरसी लागू होऊ देणार नाही. एनआरसी लागू झाल्यास हिंदू आणि मुस्लीम अशा दोघांनाही नागरिकत्व सिद्ध करण्यात खूपच अडचणी येऊ शकतात. मी असं होऊ देणार नाही, असंही ठाकरे म्हणाले.**



मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या मुलाखतीत पुन्हा एकदा हिंदुत्वाचा नारा दिला. आम्ही हिंदुत्व सोडलं नाही आणि कधी सोडणारही नाही. महाराष्ट्रात आम्ही आघाडी केली आहे. याचा अर्थ आम्ही धर्म बदलला आहे असा होत नाही. विचारधारेशी कोणतीही तडजोड केली नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

"मी काय मागितले भाजपकडे? जे ठरले होते तेवढेच द्या. मी त्यांच्याकडे चांद-तारे मागितले होते काय?" असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे भाजपासोबत युती तोडण्याच्या प्रश्नावर उत्तर देताना म्हणाले. "भारतीय जनता पक्ष शब्दाला जागला असता तर मी मुख्यमंत्री पदावर दिसलो नसतो. एखादा शिवसैनिक तेथे विराजमान झाला असता. पण हे त्या दिशेने पडलेले पहिले पाऊल आहे!" असे उद्धव ठाकरे म्हणाले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सामनाला विशेष मुलाखत दिली असून, त्यामध्ये त्यांनी सरकार स्थापनेच्या घडामोडीपासून वादग्रस्त नागरिकता कायद्यापर्यंत, राहुल गांधींपासून अजित पवारांपर्यंत प्रत्येक प्रश्नावर उत्तरे दिली आहेत.

### महाराष्ट्राचा मुख्यमंत्री बनणं हे माझं स्वप्न कधीच नव्हतं

राज्याचा मुख्यमंत्री बनायच हे माझं स्वप्न कधीच नव्हतं. मुख्यमंत्रीपद स्वीकारणं हा माझ्यासाठी धक्का नसला तरी माझं हे स्वप्न कधीच नव्हतं असे उद्धव ठाकरे सामनाला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले. 'मी माझ्या वडिलांना बाळासाहेबांना वचन दिलं होतं. त्या वचनपूर्ततेसाठी मी कोणत्याही थराला जायचं ठरवलं होतं'

### महाराष्ट्रात एनआरसी लागू होऊ देणार नाही

देशभरात नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला तीव्र विरोध होत असताना, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या कायद्याला पाठिंबा दिला आहे. त्याचवेळी राज्यात एनआरसी लागू होऊ देणार नाही, अशी रोखठोक भूमिकाही त्यांनी घेतली.




# २०१८ पेक्षा २०१९ मध्ये गुन्हे उकलण्यात पोलीसांना अपयश

**वसई** - २०१८ पेक्षा २०१९ मध्ये गुन्हे उकलण्यात पालघर पोलीसांना जास्त अपयश आले असून,गुन्हे रोखण्यात मात्र,त्यांना यश आल्याचे हाती आलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

पालघर जिल्ह्यात एकूण २३ पोलीस ठाणी आहेत. त्यापैकी अर्नाळा, विरार, तुळींज, वसई, माणिकपुर आणि वालीव ही पोलीस ठाणी वसई तालुक्यात आहेत. वाढते शहरीकरण, बकालवस्त्या, गुन्हेगारांचे वास्तव्य, अंमली पदार्थ विक्री यामुळे येथील गुन्हेगारीचे प्रमाण सतत वाढत चालले आहे. गुटखा, दारु, रेती, ड्रग्स विक्री, जबरी चोऱ्या चैन स्नॅचींग, घरफोड्या, वाहन चोरी, विनयभंग, बलात्कार, खून, दरोडे, अपघात, अपहरण, हाणामारी असे सर्वच गुन्हे २०१८ मध्ये जिल्ह्यात घडले होते. त्यात ७२ हत्या, ५५ प्राणघातक हल्ले, १७७ चोऱ्या, २२५ बलात्कार, १९ दरोडे, १७७ चेनस्नॅचींग, १४४३ वाहन चारी, ३२० विनयभंग, ७१० घरफोडया, ५०० अपघाती मृत्यू, ९३१ दुखापत आणि २७० हाणामाऱ्या अशा गुन्ह्यांचा सहभाग होता.

उर्वरित पृष्ठ 2 वर

# 'पगार आमच्या हक्काचा,नाही कुणाच्या बापाचा' आरएनए बिल्डरला मनसे दणका

**मुंबई : मनसे समर्थक अधिकृत – 'पगार आमच्या हक्काचा, नाही कुणाच्या बापाचा', 'राजसाहेब, आता तुम्हीच आम्हाला न्याय मिळवून देऊ शकता'! अशा घोषणांनी आज चेंबूर सर्कल येथील आरएनए बिल्डरच्या कार्यालयाचा परिसर दणाणून गेला.**



महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे चिटणीस केतन नाईक ह्यांनी जवळपास दोनशेहून अधिक कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना 'न्यायासाठीची लढाई जिंकायची असेल तर सर्व कामगार, कर्मचाऱ्यांनी आपली एकजूट अभेद्य ठेवायला हवी' असं मत व्यक्त केलं.

आरएनए ग्रुपच्या सुमारे ४०० कर्मचारी- कामगारांना गेली जवळपास दोन वर्षं पगार मिळालेला नाही. आपल्या हक्काचे पैसे व देणी कंपनीकडून मिळवण्यासाठी ह्या कर्मचा-यांनी अनेक प्रयत्न केले, वेगवेगळ्या कार्यालयांचे उंबरठे झिजवले, पण त्यांना कुठेही न्याय मिळाला नाही. अखेर आरएनए ग्रुपच्या कर्मचा-यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे ह्यांनाच पत्र लिहून ह्या प्रकरणात 'न्याय मिळवून द्या तसंच कर्मचा-यांची

उर्वरित पृष्ठ 2 वर

# भरचौकात तरुणीला जाळले

**वर्धा – भरचौकात एका तरुणीच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला जाळल्याची धक्कादायक घटना वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील नंदेरी चौकात घडली आहे. या घटनेनंतर आरोपीने तेथून पळ काढला, या तरुणीला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.**

याबाबत वृत्त असे कि, हि तरुणी एका महाविद्यालयात शिक्षिका असून, ती सकाळी कामावर जाण्यासाठी निघाली, त्यानंतर ती हिंगणघाटातील नंदेरी चौकात पोहोचली असता, आरोपीने पेट्रोल तिच्या अंगावर टाकले आणि तिला पेटवून दिले आणि तेथून पळ काढला. आजुबाजूच्या लोकांनी



ताबडतोब या तरुणीला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. या तरुणीवर उपचार सुरू असून तिची प्रकृती गंभीर आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची पोलिसांत नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# महाराष्ट्रातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यामागे ठाणे ग्रामीण पोलीस अग्रेसर





ठाणे ग्रामीण पोलीस हद्दीतील अपघाती मृत्यूंचे प्रमाण २६ टक्क्यांनी कमी झाले आहे. अपघात कमी करण्यात ठाणे ग्रमीण पोलीस जिल्हा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा ठरला आहे. त्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते नुकताच पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्या अनुषंगाने डॉ. शिवाजी राठोड यांनीही वाहतूक पोलीस निरीक्षक अनिल पवार व सहकारी वाहतूक पोलीसांचा सत्कार केला.

रस्त्यांवर घडणाऱ्या अपघातांपैकी ८० टक्के अपघात हे मानवी चुकीमुळे होतात. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी जबाबदार नागरिक म्हणून आपण प्रत्येकाने स्वतःला शिस्त लावून घेतली पाहिजे, असे आवाहन ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ. शिवाजी राठोड यांनी मिरा रोड येथे रस्ते सुरक्षा अभियानाच्या समारोप प्रसंगी केले. रस्ता सुरक्षा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची आवश्यक्ता त्यांनी व्यक्त केली. ठाणे ग्रामीण पोलीसांच्या वतीने रस्ते अपघात रोखण्यासाठी विविध प्रकारे जनजागृती करण्यात आली. सामाजिक संस्था , नागरिकांसह शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. शहरात जनजागृतीपर पथनाटय , सौंदर्य स्पर्धा, चित्रकला व वादविवाद स्पर्धा, पदफेरीचे आयोजन करण्यात आले होते.

उर्वरित पृष्ठ 4 वर

# चमकदार कामगिरीसाठी राज्यपालांचे एनसीसी ला ५०००० रुपयांचे बक्षीस



**नवी दिल्ली येथे नुकत्याच संपन्न झालेले एनसीसीचे प्रजासत्ताक दिन शिबीर तसेच अखिल भारतीय स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करीत पुरस्कारांची लयलुट करणाऱ्या राज्यातील एनसीसीच्या चमूला राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज पन्नास हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले.**

**महाराष्ट्र एनसीसीच्या ११६ कॅडेट्स व १० अधिकाऱ्यांच्या विजयी चमूच्या सन्मानार्थ राज्यपालांनी**

उर्वरित पृष्ठ 4 वर

# २०२०चा अर्थसंकल्प हा मुंबई व महाराष्ट्रावर अन्याय करणारा - उद्धव ठाकरे

**राज्याचे मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली आहे. हा अर्थसंकल्प देशाच्या सध्याच्या आर्थिक स्थितीशी सुसंगत नसून, वास्तवाचे भान हरपलेला आहे. देशातील युवा, शेतकरी आणि सर्वसामान्यांना स्वप्नांच्या दुनियेत रमवणारा असा हा अर्थसंकल्प असल्याची बोचरी टीका मुख्यंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे.**



IDBI आणि थ्घ्मधील आपली भागीदारी विकण्याचा घेतलेला निर्णय, रेल्वेचे खाजगीकरण यासारखे निर्णय देशाच्या खिळखिळ्या अर्थव्यवस्थेचे दर्शन घडवतात तसेच काही शासकीय बॉण्ड परदेशी लोकांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय या अर्थसंकल्पात घेतला गेला आहे, तो ही काळजी वाढवणारा आहे.

२०३० मध्ये भारत हा सर्वात युवा देश होणार असून या युवा शक्तीच्या हाताला रोजगार देण्याचा कोणताही ठोस मार्ग या अर्थसंकल्पातून विकसित होतांना दिसत नाही. पर्यटन क्षेत्र ज्यातून मोठ्या रोजगार संधी निर्माण होतात, त्यासाठी अत्यंत कमी तरतूद करण्यात आली आहे.

शेती क्षेत्रासाठी १६ सुत्री कार्यक्रम जाहीर करून रु. २.८३लाख कोटींची तरतूद या क्षेत्राला उपलब्ध केली.प्रत्यक्षात ही तरतूद मागच्या वर्षीपेक्षा थोडीच वाढली आहे. त्यामुळे अर्थसंकल्पातून व्यक्त केलेले संकल्प व त्याच्या सिद्धीसाठी केलेल्या वित्तीय तरतूदी यात विरोधाभास दिसतो.

महिला व बालविकासासाठी भरीव तरतूद अपेक्षित होती.ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग लोकांच्या हितासाठी देखील फारसे काही केलेले दिसत नाही.नाही म्हणायला अर्थमंत्र्यांनी बँकातील पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवीला विमा संरक्षण देऊन सर्वसामान्यांचे हित जोपासण्याचे प्रयत्न केल्याचे दिसते.

# अधिक गुण घेणारा व्यवहारात हुशार असतोच अस नाही

## *अजित पवारांचा फडणवीसांना टोला*

**मुंबई** - महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप घडविणारे अजित पवार यांनी आपले जुने सहकारी आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सरकार स्थापनेवरून टोला लगावला आहे. अधिक गुण घेणारा विद्यार्थी व्यवहारात हुशार असतोच असं काही नाही, अशा शब्दांत अजित पवार यांनी फडणवीसांवर टीका केली. नाशिक येथील विभागीय बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते.

कमी गुण घेणारा विद्यार्थी व्यवहारात हुशार असतो. पण अधिक गुण घेणारा व्यवहारात हुशार असतो असं काही नाही, फडणवीसांनी दुसऱ्यांदा स्थापलेले सरकार त्याचे उत्तम उदाहरण असल्याचा टोला अजित पवार यांनी फडणवीसांचे नाव न घेता लगावला. त्यामुळे एकच हशा पिकला होता.



राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर त्रिशंकू स्थिती निर्माण झाली होती. यात भारतीय जनता पक्ष सर्वाधिक जागा जिंकून प्रथम क्रमांकाचा पक्ष ठरला होता. मात्र भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेना-कॉँग्रेस-राष्ट्रवादी कॉँग्रेस यांच्यात सरकार स्थापन्याची चर्चा सुरू होती. मात्र ऐनवेळी अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी सरकार स्थापन करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला होता. फडणवीसांनी मुख्यमंत्रीपदाची तर पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती.

# संतापजनक! आईनेच १५ दिवसांच्या मुलीला वेश्या व्यवसायासाठी विकलं

**मुंबई** - पैसे कमावण्यासाठी लोक किती खालच्या थराला जाऊ शकतात, हे दाखवणारी घटना मुंबईत समोर आली आहे. मुंबई ही मायानगरी या मायानागरीत अनेक जण पोटाची खळगी भरण्याकराता वाट धरतात. कोण दिवसरात्र मेहनत करत पोट भरतो तर काही जण लवकर श्रीमंत होण्यासाठी वाकडी वाट धरतात आणि माणुसकीला काळीमा फासेल अशी कामे करतात.



वेश्या व्यवसायासाठी नवजात बालकाची विक्री करण्यात आल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. हे आरोपी पोलिसांच्या तावडीत सापडले आहेत. वेश्या व्यवसायात आणण्यासाठी हे आरोपी नवजात बालकाची बिहारमधून तस्करी करून मुंबईत आणत आणि त्यांची विक्री कुंटन खान्यात करत होते. बांद्रा पश्चिम येथील कुरेशी नगरमध्ये काही व्यक्ती नवजात बालकाला घेऊन वेश्या व्यवसायात विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला आणि आरोपींना अटक केली. याप्रकरणी पोलिसांनी २ वेश्या दलाल महिलांसह एका पुरुष दलालाला अटक केली आहे. पोलिसांनी आरोपींकडून १५ ते २० दिवसांचे नवजात बाळ हस्तगत केल आहे. तपासात हे बाळ बिहारमधील एका महिलेने जन्म दिल्यानंतर केवळ दहा हजार रुपयांना विकले होते. दहा हजाराच्या मुलीचा सौदा केल्यानंतर तिला कुरेशी नगर येथे आणण्यात आले होते.

# सिग्नलवरील 'हॉर्नहौसे'ला आता खोळंब्याची शिक्षा

## वाहनचालकांना शिस्त लावण्यासाठी पोलिसांचा नवा प्रयोग




**मुंबई : सिग्नल लाल असताना हॉर्न वाजवण्याचा मोह, सवय किंवा उतावीळपणा आता वाहनचालकांना सोडून द्यावा लागणार आहे. तसे न केल्यास त्या हॉर्नहौसेला मोठ्या खोळंब्याची शिक्षा मिळणार आहे. ध्वनीप्रदूषण रोखण्यासह वाहनचालकांच्या बेशिस्तीला लगाम घालण्यासाठी मुंबई पोलीस एक प्रयोग राबविणार आहेत. त्याद्वारे हॉर्नच्या आवाजाने ८५ डेसीबलची पातळी ओलांडल्यास सिग्नल हिरवा होण्याऐवजी लालच राहील, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. वाहतूक पोलीस दलाचे सहआयुक्त मधुकर पांडे यांनी या माहितीला दुजोरा दिला.**

सिग्नल लाल असूनही अनेक वाहनचालक विनाकारण हॉर्न वाजवून पुढे थांबलेल्या वाहनांना इशारा करतात. सिग्नल किती सेकंदात रंग बदलेल याची सूचना वाहन चालकांना देणारी यंत्रणा मुंबईत बहुतांश ठिकाणी आहे. सिग्नलसोबत जोडलेल्या इंडीकेटरवरील कमी होत जाणारे सेकंद चालकांना किती वेळ थांबावे, पुढे जाण्यासाठी किती वेळ आहे, याची माहिती देतात. मात्र तेथेही हॉर्नच्या आवाजाचा कलकलाट असतो. वाहतूक पोलिसांनी नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये मरिन ड्राईव्ह, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील चौकांमध्ये १० मिनिटांसाठी आवाजाची पातळी मोजणारी यंत्रणा उभी केली. तेव्हा सिग्नलवरील आवाजाची पातळी ८५ डेसीबलची मर्यादा ओलांडते हे स्पष्ट झाले. याच प्रयोगांमध्ये आवाजाची पातळी ८५ डेसीबलपुढे गेल्यास सिग्नल हिरवा होण्याऐवजी पुन्हा दिड मिनिटांसाठी लाल ठेवण्यात आला. सकाळच्या घाईच्या वेळेत दिड मिनिट खोळंबा झाल्याने चालक आणि प्रवासी प्रचंड अस्वस्थ झाल्याचे पोलिसांनी पाहिले.

बेशिस्त चालकांना वठणीवर आणण्यासाठी किंवा हॉर्नमुळे पादचारी-रहिवाशांना किती त्रास होतो याची जाणीव करून देण्यासाठी अशा प्रकारची शिक्षा करावी, असे वाहतूक पोलिसांनी ठरवले आहे. त्यासाठी नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये प्रयोग करण्यात आले. प्रयोग करताना सिग्नलवर जे चित्र होते ते कॅमेऱ्यात टिपले गेले. शुक्रवारी या चित्रणाच्याआधारे तयार केलेली ध्वनीचित्रफीत मुंबई पोलिसांनी ट्वीटरद्वारे सर्वदूर प्रसारित केली. ती मुंबईसह आसपासच्या महानगरांमध्ये चर्चेचा विषय ठरली.

थेट कारवाई सुरू करण्याऐवजी जनजागृती करावी या उद्देशाने ही चित्रफीत समाजमाध्यमांवरून प्रसारित करण्यात आल्याचे सहआयुक्त पांडे यांनी स्पष्ट केले. नागरिकांचा प्रतिसाद, प्रतिक्रिया लक्षात घेऊन प्रयोग सुरू करण्यात येणार आहे. त्याबरोबरच या कारवाईमुळे वाहतुकीचा खोळंबा, त्याचे परिणाम आदी बाबींचाही अभ्यास केला जाणार आहे. त्यानंतर पुढल्या काही दिवसांत शहरातील एका चौकातल्या सिग्नलवर आवाजाची पातळी मोजणारे यंत्र बसवले जाईल. आवाजाने ८५ डेसीबलची मर्यादा ओलांडली की सिग्नल आणखी काही काळासाठी लाल राहिल, अशी स्वयंचलीत यंत्रणा उभारली जाईल. सिग्नल किती सेकंदांसाठी लाल राहिल किंवा बेशिस्त चालकांचा आणखी किती सेकंद खोळंबा करायचा हेही ठरवले जाईल. एका चौकात हा प्रयोग राबविल्यानंतर अन्य चौकात तशी व्यवस्था केली जाईल. हळूहळू सर्व मुंबईत ही व्यवस्था केली जाईल, असे पांडे यांनी स्पष्ट केले.

बहुतांश वाहने वातानुकुलीत असल्याने आपल्याच हॉर्नचा किती त्रास होतो याची जाणीव चालक, प्रवाशांना होत नाही. मात्र पादचारी, आसपासची वस्ती, रुग्णालये, शाळांना या कलकलाटाचा प्रचंड त्रास होतो, अशी प्रतिक्रिया वाहतूक पोलीस व्यक्त करतात.

### प्रयोग काय?

**सिग्नल लाल असताना वाहनचालकाने हॉर्न वाजवला आणि त्याच्या आवाजाच्या पातळीने ८५ डेसीबलची पातळी ओलांडली तर सिग्नल आणखी काही मिनिटे लाल राहील. सिग्नल लाल राहिल्याने त्याच्यासह अन्य वाहनचालकांचा आणखी खोळंबा होईल. हा खोळंबा हीच बेशिस्त चालकांसाठी शिक्षा असेल. हा प्रयोग करण्यापूर्वी त्याबद्दल वाहनचालकांमध्ये जागृती करण्यात येईल. हॉर्नचा त्रास पादचारी, आसपासची वसाहत, रुग्णालये आणि शाळांना किती आणि कसा होतो, याची जाणीव वाहनचालकांना या प्रयोगातून व्हावी, अशी अपेक्षा आहे.**

# प्रत्येक घरासाठी स्वतंत्र मालमत्ता कर देयक

**मुंबई** : येत्या आर्थिक वर्षांत सर्वच सदनिकांना आपले स्वतंत्र मालमत्ता कराचे देयक देण्याचा पालिका प्रशासनाचा विचार आहे. त्यामुळे नवीन इमारतींबरोबरच जुन्या सोसायट्यांमध्येही स्वतंत्र देयक मिळू शकणार आहे. सध्या केवळ २०१२ नंतरच्या इमारतींमध्येच स्वतंत्र देयक दिले जाते. पालिकेच्या मालमत्ता कराची वसुली वाढावी म्हणून एप्रिलपासून करनिर्धारण विभागाने स्वतंत्र देयकांचे लक्ष्य ठेवले आहे.

जकात बंद झाल्यानंतर पालिकेची सगळी आर्थिक मदार ही मालमत्ता करावर अवलंबून आहे. मात्र मालमत्ता कराच्या वसुलीचे लक्ष्य गाठताना करनिर्धारण विभागाच्या नाकीनऊ येत आहेत. अनेक मोठ्या कंपन्यांनी मालमत्ता कर थकवला असून त्यांच्या थकबाकी वसुलीची प्रकरणे प्रलंबित आहेत. मालमत्ता कराची वसुली वाढवण्यासाठी पालिका दरवर्षी अर्ली बर्डसारख्या योजना राबवत असते. मात्र काही ठरावीक सदनिकाधारकांनी आपला कर भरला नाही की संपूर्ण सोसायटीचा कर थकीत होतो आणि सोसायटीवर जल जोडणी कापण्याची कारवाई केली जाते. त्यामुळे नियमितपणे कर भरणाऱ्यांचा तोटा होतोच




पण पालिकेचाही होतो. त्यामुळे पालिकेने नवीन इमारतींना प्रत्येक सदनिकेला स्वतंत्रपणे मालमत्ता कराचे देयक देण्यास सुरुवात केली आहे. सध्या २०१२ नंतरच्या सर्वच इमारतींना स्वतंत्र बिल दिले जाते. मात्र आता टप्प्याटप्प्याने सर्वच इमारतींना स्वतंत्र देयक देण्याचा पालिका प्रशासनाचा प्रयत्न आहे. २०२०-२१ मध्ये स्वतंत्र बिले देण्याचा प्रयत्न असल्याचे पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

मालमत्ता कर आकारताना तो इमारतींवर किंवा संबंधित सहकारी सोसायटीवर आकारण्याची यापूर्वीची पद्धत आहे. मात्र प्रामाणिकपणे मालमत्ता कर भरणाऱ्या सदनिकाधारकांना अनेकदा कर थकवणाऱ्या सदनिकाधारकांमुळे नाहक भुर्दंड सोसावा लागतो. मात्र स्वतंत्र देयक दिल्यास सदनिकाधारकांना आपला मालमत्ता कर आपल्या सोयीने ऑनलाइन भरता येणार आहे. त्याचबरोबर लवकर मालमत्ताकर भरल्यास 'अर्ली बर्ड डिस्काऊंट'सारख्या सुविधांचा लाभ मिळू शकणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अनेकदा सोसायट्या सदनिकाधारकांकडून मालमत्ता कराची वसुली करतात, मात्र ते पैसे बँकेत ठेवून अगदी शेवटच्या दिवशी पालिकेकडे भरतात. त्यामुळे पालिकेचे नुकसान होते.

# मराठीतून शिकल्याने नोकरी नाकारली

## *पालिकेकडून १०२ उमेदवारांची निराशा*

**मुंबई** – मराठीचा कैवार घेणाऱ्या शिवसेनेची महापालिकेत सत्ता असतानाही प्राथमिक-माध्यमिक शिक्षण मराठी माध्यमातून घेतल्यामुळे १०२ उमेदवारांना पालिकेत नोकरी नाकारण्यात आली आहे.

महापालिकेच्या शाळांसाठी शिक्षकांची भरतीप्रक्रिया सुरू असून 'पवित्र पोर्टल'च्या माध्यमांतून निवडलेल्या १०२ उमेदवारांना शेवटच्या क्षणी नोकरी नाकारण्यात आली. पालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी दहावीपर्यंतचे शिक्षण इंग्रजीतूनच हवे, अशी अट असल्याचे शिक्षण विभागाचे म्हणणे आहे. मात्र या प्रकारामुळे मराठीतून शिकलेल्या या उमेदवारांची नोकरीची संधी हुकली आहे. इंग्रजी शाळांकडे पालकांचा कल वाढल्यामुळे पालिकेने काही वर्षांपूर्वी अर्ध इंग्रजी आणि संपूर्ण इंग्रजी माध्यमाच्या 'मुंबई पब्लिक स्कूल' शाळा सुरू केल्या. या शाळांसाठी भरतीप्रक्रिया सुरू असून पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकांच्या भरतीसाठी परीक्षा घेण्यात आल्या होत्या. त्यात उत्तीर्ण झालेल्या १०२ उमेदवारांची महापालिकेच्या इंग्रजी शाळांसाठी निवड करण्यात आली. मात्र या उमेदवारांना त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण मराठीत असल्यामुळे इंग्रजी शाळेत त्यांची शिक्षक म्हणून नेमणूक करता येणार नाही असे कारण देण्यात आले.

डावलण्यात आलेल्या या उमेदवारांचे पदवी आणि पदव्युत्तर बीएडपर्यंतचे शिक्षण इंग्रजी माध्यमातूनच झाले आहे. मराठीचा उदोउदो करणाऱ्या शिवसेनेची महापालिकेत सत्ता असताना मराठी उमेदवारांना नोकरी नाकारल्यामुळे साहजिकच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने हा मुद्दा उचलून धरला आहे. त्यामुळे या मुद्द्यावरून शिवसेना अडचणीत सापडली आहे.

पालिकेने भरतीबाबत काढलेल्या जाहिरातीत इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी इंग्रजीमधून शिकलेले शिक्षक हवे असल्याची अट होती. मात्र राज्य सरकारच्या 'पवित्र पोर्टल'च्या माध्यमातून या शिक्षकांची दिशाभूल झाल्याचा दावा पालिका प्रशासनाने केला आहे. त्यामुळे आता या मुद्द्यावरून आरोप प्रत्यारोपही सुरू झाले आहेत. या शिक्षकांनी पालिकेच्या एमपीएस शाळांऐवजी यूपीएस 'अर्बन प्रायमरी स्कूल' शाळांसाठी अर्ज केला असता तर ते सर्व शिक्षक पात्र ठरले असते, अशी प्रतिक्रिया महापौर किशोरी पेडणेकर यांनी दिली.



मराठी भाषक उमेदवारांवर अन्याय होऊ नये म्हणून त्यांना 'यूपीएस' शाळांमध्ये सामावून घेता येऊ शकते का याची चाचपणी केली जाईल, असे महापौरांनी सांगितले. तसेच काही जण शिवसेनेला बदनाम करण्यासाठी वाद उकरून काढत असून त्यामुळे उमेदवारांचे नुकसान होईल, असेही महापौर पेडणेकर म्हणाल्या.

दरम्यान, या संपूर्ण प्रकारामुळे आमचे नुकसान झाले आहे. नक्की चूक कोणाची त्यावरून आता आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. पण आमच्यासाठी मात्र अन्य पर्यायही बंद झाले आहेत, अशी उद्विग्नता उमेदवार संगीता चव्हाण यांनी दिली आहे.

# गडकिल्ल्यांवर दारू पिणाऱ्यांना सहा महिने तुरुंगवास, १० हजारांचा दंड

**मुंबई** - महाराष्ट्रातील गडकिल्ले हे राज्याच्या सुवर्ण इतिहासाचे साक्षीदार आहेत. या गडकिल्ल्यांवर गेल्या काही काळात दारूपार्ट्या करून धिंगाणा घालण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी आता गडकिल्ल्यांवर दारू पिऊन गैरवर्तन करणाऱ्यांना सहा महिन्यांचा सश्रम तुरुंगवास तसेच १० हजार रुपयांपर्यंतचा दंड ठोठावण्यात येणार आहे. राज्याच्या गृहविभागाने हा निर्णय घेतला आहे.

राज्यात ३५०च्या वर गडकिल्ले आहेत. मात्र गेल्या काही काळात या किल्ल्यांना 'पिकनिक स्पॉट' समजून पार्ट्या करणे, दारू पिऊन धिंगाणा घालण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. शिवप्रेमींनी अशा दारूड्यांना चोप दिल्याचेही समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गडकिल्ल्यांचे पावित्र्य राखण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ८५ अंतर्गत आता गडकिल्ल्यांवर दारू



पिऊन धिंगाणा घालणाऱ्यांना आता सहा महिन्यांचा तुरुंगवास व १० हजार रुपये दंड ठोठावण्यात येणार आहे. पुन्हा अशा अपराधाची पुनरावृत्ती झाल्यास शिक्षेचा कालावधी एका वर्षाचा असणार आहे. या दारूबाजांवर पोलिस तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत कारवाई करण्यात येणार आहे. या शिक्षेबाबतच्या तरतुदी सर्व गडकिल्ले व पुरातन वास्तूंच्या दर्शनी भागात नागरिकांच्या माहितीस्तव लावण्यात येणार आहेत.

पृष्ठ १ वरुन

# 'पगार आमच्या हक्काचा,नाही कुणाच्या बापाचा'आरएनए बिल्डरला मनसे दणका

आर्थिक पिळवकणूक व दमदाटी करणा-या आरएनए मालकाला धडा शिकवावा', अशी विनंती केली आहे.

आरएनए ग्रुप ही मुंबईतील एक मोठी रिअल इस्टेट कंपनी आहे. ह्या कंपनीच्या कर्मचा-यांना फेब्रुवारी २०१८पासून पगार मिळालेला नाही. गेल्या दोन-तीन वर्षांत अनेक कर्मचा-यांना कंपनीच्या मालकाने दमदाटी करून नोकरी सोडण्यास भाग पाडले, तर आर्थिक मंदी असल्यामुळे दुसरीकडे नोकरी मिळणं शक्य नसल्यामुळे अनेकजण पगार मिळत नसतानाही काम करत राहिले. पीएफ, ग्रॅच्युइटी आणि फॉर्म १६ ची थकबाकीसुद्धा कर्मचा-यांना मिळालेली नाही. ह्यासंदर्भात आरएनए कंपनीचे संचालक अनुभव अग्रवाल आणि गोकुळ अग्रवाल ह्यांच्याशी अनेकदा संपर्क साधूनही ते कर्मचा-यांना कोणताही प्रतिसाद देत नसल्यामुळे कर्मचा-यांनी कामगार न्यायालय तसंच नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनल (ज्ञ्थ्ऊ) येथेही पत्रव्यवहार केला. मात्र त्यांना न्याय मिळाला नाही. आता शेवटचा पर्याय म्हणून कंपनीच्या सुमारे २०० कर्मचा-यांनी लेखी पत्राद्वारे मनसे अध्यक्ष राज ठाकरे ह्यांनाच साकडं घातलं आहे. कर्मचा-यांच्या हक्काच्या थकबाकीची रक्कम २० कोटी इतकी आहे.

ह्याविषयी अधिक माहिती देताना महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे चिटणीस केतन नाईक म्हणाले, 'मे २०१४मध्ये आरएनए ग्रुपचे संस्थापक अनिल अग्रवाल ह्यांचं निधन झाल्यानंतर कर्मचा-यांचा पगार देण्यात अनियमितता येऊ लागली. २०१६मध्ये तर कर्मचा-यांना तब्बल सहा महिने पगारच मिळाला नव्हता. फेब्रुवारी २०१८नंतर तर कर्मचा-यांना अजिबात पगार मिळालेला नाही. त्यामुळे ह्या कर्मचा-यांना घरचा खर्च चालवणंही कठीण झालं आहे. अखेर त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे ह्यांना पत्र लिहिलं.'


महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे कार्याध्यक्ष संतोष धुरी आणि चिटणीस केतन नाईक ह्यांच्याकडे आरएनए ग्रुपचे कर्मचारी आपली समस्या घेऊन आल्यानंतर त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंना विनंती करणारं पत्र लिहिलं तसंच, 'मनकासे'चं सदस्यत्व स्वीकारलं. 'महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण ह्यांनी २४ डिसेंबर २०१९ला राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ह्यांना आरएनए संदर्भात पत्र पाठवलं होतं. त्यानंतर कर्मचा-यांच्या मागण्यांविषयीची चर्चा करण्यासाठी आम्ही आरएनए व्यवस्थापनाला सहा जानेवारीला लेखी पत्र पाठवलं. पण त्याला कोणतंही उत्तर व्यवस्थापनाकडून आलं नाही. त्यामुळे आता पुढच्या आठवड्यात आम्ही सर्व कर्मचा-यांना घेऊन आरएनए कार्यालयाबाहेर शांततापूर्ण निषेध आंदोलन करणार आहोत. त्यालाही जर व्यवस्थापनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, तर मात्र आम्हाला कर्मचा-यांच्या न्याय्य हक्कांसाठी तीव्र आंदोलन करावंच लागेल', असं 'मनकासे'चे चिटणीस केतन नाईक ह्यांनी सांगितलं.

# २०१८ पेक्षा २०१९ मध्ये गुन्हे उकलण्यात पोलीसांना अपयश

२०१९ मध्येही हे सर्व गुन्हे घडले असले तरी पोलीसांच्या सतर्कतेमुळे त्यांचे प्रमाण कमी झाले. मात्र,त्यांची उकल करण्यात त्यांना मागील वर्षापेक्षा अधिक अपयश आल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. २०१८ मध्ये गुन्हांची वाढ झाली होती. पण उकलही चांगली झाली होती. २०१९ मध्ये मात्र गुन्ह्यांमध्ये वाढ झाली नसली तरी उकलच्या आकडेवारीतही वाढ झाली नाही. २०१९ मध्ये ७२ हत्या, ३८ प्राणघातक हल्ले, १५८ चोऱ्या, २२१ बलात्कार, १० दरोडे, १५८ चेनस्रॅचींग,१३५४ वाहने चोरी, ३३९ विनयभंग, ६५६ घरफोडया, ४५४ अपघाती मृत्यू, ८९९ दुखापती आणि २५० मारामारीचे गुन्हे दाखल झाले.

गेल्या पाच वर्षात घडलेल्या वाहन चोरीच्या घटनांमुळे नागरिक हैराण झाले आहेत.इमारतीच्या आवारातून, घराच्या अंगणातून दुचाकी,चारचाकी चोरण्यात आल्या आहेत. २०१४ ते २०१९ दरम्यान चोरीला गेलेल्या हजारो वाहनांपैकी ३ हजार वाहने अद्यापही बेपत्ता आहेत.

## संपादकीय...



# आजारी रुग्णालये



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

सर्व प्रकारच्या उदासीनतेमुळे अशक्तच नव्हे, तर आजारी पडलेल्या सरकारी रुग्णालयांचे दाहक वास्तव अनेकदा समोर आले असूनही सरकारी यंत्रणांपर्यंत ती आच का पोचत नाही, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. अचानक जाग येऊन उपाययोजनांच्या वगैरे घोषणा केल्या जातात, त्या एखाद्या दुर्घटनेनंतरच! फार तर चौकशी समित्यांच्या अहवालांमध्ये भर पडते. पण नंतर सगळे सामसूम होते. राजस्थानमधील कोटा येथील सरकारी रुग्णालयाच्या विपरीतच नव्हे, तर भयावह अवस्थेमुळे महिनाभरात शंभरहून अधिक नवजात बालकांना आपला जीव गमवावा लागला. त्यांच्या वाट्याला हे का आले? त्यांच्या पालकांवर दुःखाचा डोंगर का कोसळला? बहुधा त्यांचा 'गुन्हा' एकच, आणि तो म्हणजे खासगी वैद्यकीय सेवा घेण्याची ऐपत नसणे. जिथे जिथे एखाद्या सरकारी सेवेचा संबंध



येतो, तिथे तिथे ती सेवा घेणाऱ्याचे कशा प्रकारे हाल होतात, याचा अनुभव सर्वसामान्य नागरिकांनी कधी ना कधी घेतलेला असतो. त्यामुळे मूळ दुखणे सरकारी नोकरशाहीतील संवेदनशीलतेच्या, उत्तरदायित्वाच्या अभावात आहे. त्यापायी किती मनुष्यबळ तास वाया जातात, किती मनस्ताप होतो आणि किती प्रकारचा भ्रष्टाचार होतो, याच्या रूक्ष कहाण्यांना अंत नाही. पण हेच जेव्हा आरोग्याच्या बाबतीतही असेच घडते, तेव्हा तो जिवाशी केलेला खेळ ठरतो. तसा तो राजस्थानातील कोटा येथेच होतो असे नाही. देशाच्या अनेक भागांत ही विदारक परिस्थिती आहे.

उत्तर प्रदेशात चमकी तापामुळे अनेकांचा मृत्यू ओढवल्यानंतर अशाच पद्धतीने खळबळ उडाली होती, राजकीय आरोप-प्रत्यारोपांना ऊत आला; पण काही मूलभूत सुधारणा घडल्या असे झाले नाही. याचे कारण राजकीय नेतेही अशा दुर्घटनांकडे पक्षीय चष्म्यातून पाहतात. कोटा येथील भीषण वास्तव समोर आल्यानंतर राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी दरवर्षीची आकडेवारी पुढे करून स्वतःची कातडी बचावण्याचा पवित्रा घेतला, तर भाजपने राजस्थानातील काँग्रेसच्या कारभाराचे वाभाडे काढण्याचे निमित्त या दृष्टिकोनातून त्याकडे पाहिले. खरे म्हणजे सगळ्यांनी मिळून व्यवस्थेतल्या त्रुटी, उणिवा आणि भगदाडे यावर कायमस्वरूपी इलाज शोधण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. कोटा हा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचा मतदारसंघ.

त्यांनी या बाबतीत पुढाकार घेऊन केवळ त्या भागासाठीच नव्हे, तर देशातील एकूण सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुदृढ करण्याच्या मार्गांवर मंथन घडवून आणावे आणि कृतीच्या दिशा निश्‍चित कराव्यात, अशी अपेक्षा आहे. राजस्थानात सध्या बोचणारी थंडी आहे. अशा वातावरणात अर्भकांची तर खूपच काळजी घ्यावी लागते. पण कोटा येथील रुग्णालयातील खिडक्याही धड नव्हत्या. तावदाने फुटलेली, दारे तुटलेली आणि परिसरात डुकरांचा वावर, असे एकूण दृश्य 'राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगा'च्या प्रतिनिधींना तेथे दिलेल्या भेटीच्या वेळी आढळून आले. अनेक महत्त्वाची जीवरक्षक वैद्यकीय उपकरणेही नादुरुस्त असल्याचे आढळून आले आहे. डॉक्टर, परिचारिका व अन्य कर्मचाऱ्यांची संख्याही अगदीच तोकडी आहे. त्यामुळे जे काम करताहेत, त्यांच्यावर बराच ताण पडत असणार. हे चित्र अर्थातच देशभरातील अनेक सरकारी आरोग्य केंद्रे, रुग्णालये यांचे आहे. या सर्वच प्रश्नांच्या सोडवणुकीची गरज आहे. आरोग्यावरील सरकारी खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या १.३ टक्के आहे. ते प्रमाण वाढवण्याची गरज आहे. पण एवढेच पुरेसे नाही.

त्या उपलब्ध निधीचा विनियोग अत्यंत काटेकोरपणे केला जावा. निष्णात डॉक्टर सार्वजनिक आरोग्यसेवेच्या क्षेत्रात यायला हवेत, यात शंका नाही. पण नुसती आवाहने करून ते येतील, असे नाही. त्यांचा मोबदला खासगी क्षेत्राइतका भरमसाठ नाही; पण निदान वास्तववादी नि व्यवहार्य असायला हवा. शिवाय केवळ पैसा कमी म्हणून चांगले डॉक्टर इकडे पाठ फिरवितात, असेही नाही. त्यांना प्रोत्साहक वाटेल अशा वातावरणाचीही गरज आहे. दुर्गम भागात, आदिवासी पाड्यांत, खेड्यांमधून काही डॉक्टर सेवाभावी वृत्तीने काम करीत असतात. त्यांच्या अशा सुट्या सुट्या प्रयत्नांना चांगले कोंदण लाभले, तर अशा 'असर'कारी कामांची व्याप्ती बरीच वाढवता येईल. कल्याणकारी शासनव्यवस्थेविषयी आपण बोलतो; परंतु या दाव्याला भक्कम आधार द्यायचा असेल तर कल्याणकारी कार्यक्रमांचा, योजना अंमलबजावणीचा दर्जा नि गुणवत्ता उंचावण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. तशा निर्धारानेच आजारी रुग्णालयांची स्थिती सुधारू शकेल.

## सुशिक्षित बेरोजगार इंजिनियर्सच्या नावावर भ्रष्ट ठेकेदारांचा 'गोरखधंदा'

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामध्ये जे चाललंय ते भयानक आहे. हिमालय पाटील या इंजिनिअरने दिलेली माहिती धक्कादायक आहे. महाराष्ट्र शासनाने इंजिनिअरिंगची पदवी घेऊनही ज्यांना नोकरी मिळाली नाही त्यांच्यासाठी बांधकाम विभागाची कामे करण्यासाठी परवाना देण्याची योजना आणली. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना ३० लाख रुपयांपर्यंतची कामे देता येतील, असा निर्णय घेतला. हा निर्णय जसा सुबेंच्या हिताचा होता तसाच तो जनतेच्या हिताचाही होता. पैसा मिळतो म्हणून कुणीही ठेकेदार होतो आणि कामांचा दर्जा खालावतो. त्यापेक्षा इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतलेल्यांनीच कामं घेतली तर ते चांगल्या प्रकारे कामे करतील व कामांचा दर्जाही राखतील, असे शासनाला वाटत होते. मात्र झाले उलटेच. इंजिनीअरची पदवी घेतलेल्या या सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी या निर्णयाचा गैरफायदा घ्यायला सुरुवात केली आहे. त्यांना मिळालेली 'लायसन्स' विकून पैसे कमावण्याचा 'गोरखधंदा' त्यांनी सुरु केला आहे. त्यामुळे शासनाचा जो प्रामाणिक उद्देश होता तो सफल न होता उलट टक्केवारीचा एक टेबल वाढला गेला आहे. त्यामुळे भ्रष्टाचारामध्ये अधिक भर पडली आहे.

पालघर जिल्ह्यामध्ये शेकडो 'सुबे' आहेत. त्यांच्यामध्ये आता कामे घेण्यावरून हाणामाऱ्या सुरू झाल्या आहेत. त्यातूनच सुबेंच्या नावावर चाललेला 'गोरखधंदा' चव्हाट्यावर आला आहे. इंजिनिअरींगची पदवी घेतल्यानंतर त्यांची नोंदणी सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये व जिल्हा परिषदेच्या बांधकाम खात्याकडे केली जाते. सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये ही नोंदणी ऑनलाईन पद्धतीने व पूर्ण चौकशी करूनच केली जाते, असे म्हणतात. जिल्हा परिषद मध्ये हीच नोंदणी ऑफलाईन पद्धतीने होते. सुबेंची पदवी प्रमाणपत्र घेऊन त्यांना लायसन्स दिले जाते. या ऑफलाईन पद्धतीचा गैरफायदा अनेक बोगस सुबेंनी घेतला आहे, असे बोलले जाते. नोंदणी झालेल्या सुबेंची त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी केली तर अनेक बोगस ' सुबे ' तुरुंगात जातील अशी परिस्थिती आहे. इंजिनिअरिंगची पदवी घेतलेले इंजिनिअर चार वर्ष प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन पदवी घेतात. त्यांनी त्या पदवीचे पूर्ण ज्ञान आत्मसात केलेले असते. मात्र त्याचवेळी राजस्थान, कर्नाटक वा अन्य राज्यांमधील कॉलेजमध्ये फक्त प्रवेश घेऊन, कॉलेजमध्ये न जाता पैसे भरून पदवीची प्रमाणपत्र मिळवली जातात. असे पदवीधारक शेकडोंच्या संख्येने आहेत. त्यांना कुठलेही इंजिनीरींगचे ज्ञान नाही मात्र पैशांच्या बळावर मिळालेली पदवी आहे. ही पदवीही ग्राह्य धरून त्यांना लायसन्स दिले जाते. याच लायसन्सच्या आधारावर जिल्हापरिषदेमधून कामे मिळवली जातात व ती कामे विकून पैसे कमावण्याचा 'गोरखधंदा' राजरोसपणे केला जातो.

खरा वाद येथेच आहे. जे इंजिनिअर चार वर्ष नियमित कॉलेजला जाऊन पदवी घेतात ते इंजिनिअर आणि फक्त पदवी मिळविण्यासाठी बाहेरील राज्यातील इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन पदवी घेतलेले इंजिनिअर यांच्यामध्ये कसलाही फरक केला जात नाही. दोघांनाही समान तराजूमध्ये तोलले जाते. त्यामुळे ' खरे इंजिनिअर ' आणि ' खोटे इंजिनिअर ' असा वाद सुरू आहे. आम्हाला माहिती देताना इंजिनिअर हिमालय पाटील म्हणाले की, ' ३ वर्षाचा डिप्लोमा वा ४ वर्षाची पदवी घेणारे इंजिनिअर आणि फक्त पैशांच्या जीवावर पदवी मिळवणारे इंजिनिअर यांच्यामध्ये खूप मोठा फरक आहे. आम्ही प्रत्यक्ष अभ्यास केलेला असतो. प्रात्यक्षिक केलेले असते. परीक्षा दिलेल्या असतात. मेहनतीने पदवी घेतलेली असते. आम्हाला इंजिनीअरिंगचे ज्ञान असते. मात्र ज्यांना कुठल्याही प्रकारचे ज्ञान नाही त्यांच्याशी आमची बरोबरी केली जाते. हा आमचा खूप मोठा अपमान आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये बाहेरील राज्यातील पदवीची चौकशी करून लायसन्स दिले जाते. जिल्हा परिषदमध्ये मात्र कुणालाही लायसन्स मिळते. त्याचा परिणाम कामांच्या दर्जावर होतो. त्यातच हे लोक फक्त पैसे कमावण्यासाठीच लायसन्स घेतात, त्यामुळे गैरमार्गींचाही खुलेआम वापर होतो. हा प्रकार कुठेतरी थांबला पाहिजे. '

हिमालय पाटील यांच्या म्हणण्यामध्ये बरेचसे तथ्य आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग जर चौकशी करून व ऑनलाईन पद्धतीने सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना लायसन्स देते परंतु जिल्हा परिषद कुठलीही चौकशी न करता ' ऑफलाईन ' पद्धतीने लायसन्स देते. त्यामुळे बोगस पदवीधारक अभियंत्यांना मोकळे रान मिळाले आहे. तेथूनच खरे इंजिनिअर आणि खोटे इंजिनिअर असा वाद सुरू झाला आहे. हा वाद मिटवायचा असेल आणि खऱ्या इंजिनिअर्सना न्याय द्यायचा असेल तर जिल्हा परिषदेनेही लायसन्स वाटप हे ऑनलाईन पद्धतीने व पूर्ण चौकशी करून द्यायला हवेत. नक्की लायसन्स धारक इंजिनियर्सच कामे करतात का? हे तपासायला हवे. नाहीतर बरेच इंजिनियर्स हे काम न करता फक्त टक्केवारी घेण्यातच धन्यता मानतात. त्यांच्या नावावर उलट-सुलट धंदे हे भ्रष्ट ठेकेदार करतात व नामानिराळे राहतात. खोटी बिले काढतात. बोगस कामे करून पैसे हडपतात. प्रकरण उघडकीस आले तर त्या भ्रष्ट ठेकेदारांचे काही जात नाही. लटकतो तो सुशिक्षित बेरोजगार अभियंता.

दोनच वर्षांपूर्वी आम्ही विक्रमगड तालुक्यातील खुडेद येथील काम न करताच इमारतीचे बिल काढल्याचे प्रकरण बाहेर काढले होते. त्याही प्रकरणामध्ये मुंब्रा येथील सुशिक्षित बेरोजगार अभियंता अडकला होता. तो जवळपास दोन वर्षे तुरुंगात होता. हे प्रकरण खूप गाजले होते. तरीही या प्रकरणापासून कुठलाही सुशिक्षित बेरोजगार अभियंता बोध घ्यायला तयार नाही. निम्म्याहून अधिक अभियंत्यांनी आपली लायसन्स विकली आहेत आणि लायसन्स विकत घेणाऱ्यांनी टेंडर भरण्याची ' दुकानं ' उघडून टक्केवारीने पैसे कमावण्याचा ' गोरखधंदा ' सुरू केला आहे.

इंजिनीअरची डिग्री मिळवायची आणि जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून लायसन्स घ्यायचे त्यानंतर प्रत्यक्षात कुठलेही काम न करता फक्त टक्केवारी घ्यायची, असा प्रकार हे सुबे करताना दिसत आहेत. याच लायसन्स धारक इंजिनिअर्सच्या नावावर काही महाभागांनी ' धंदा ' सुरू केला आहे. या धंदेवाल्याकडे दहा ते पंधरा सुबेंची लायसन्स असतात. त्यांच्या डिजिटल सिग्नेचर व कोरे चेक असतात. हेच ' धंदेवाले ' कुठल्याही कामाचे टेंडर भरतात, कामे घेतात व विकतात. ज्याचे लायसन्स आहे त्या सुबेला काम कधी घेतले आणि त्या कामाचे नेमके काय झाले? याचा थांगपत्ताही नसतो. विशेष म्हणजे काम घेतल्यानंतर करारपत्रावर, बी१ टेंडर वर, वर्कऑर्डर, मोजमाप पुस्तिकेवर व बिलांसह इतर कागदपत्रांवर अश्या सुमारे ५० ते ६० सह्या कराव्या लागतात. मात्र या सह्याही हेच ' धंदेवाले ' मारतात. त्यावर कुठल्याच कर्मचाऱ्याची वा अधिकाऱ्याचा आक्षेप नसतो. या सह्यांची तपासणी केल्यास ' बोगस धंदेवाले सयाजीराव ' उघडे पडतील आणि त्याचबरोबर खोट्या सह्यांनाही टक्केवारी घेऊन मान्यता देणारे कर्मचारी व अधिकारी तोंडघशी पडतील. विशेष म्हणजे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील कुठल्याच कर्मचाऱ्याला व शाखा अभियंत्याला नेमका ' सुबे ' कोण? हेच माहीत नसते. त्यांचा हिशेब टक्केवारीचा असतो. ठरलेली टक्केवारी मिळाली की कुणीही सह्या मारा आणि कुठलीही कागदपत्रे कशीही रंगवा याला त्यांची हरकत नसते. बांधकाम विभागातील ८० टक्के शाखा अभियंत्यांना ठेकेदारांनी कामाला ठेवले आहे की काय? असा प्रश्न पडतो. कारण ते पगार जरी बांधकाम विभागाचा घेत असले तरी कामे मात्र ठेकेदारांच्या घरगड्यासारखी करतात. **(क्रमशः)**

# विद्यार्थिनींनी रचली अपहरणाची कहाणी; मीरा रोडमधील प्रकार

**मीरा रोड : आई मारते म्हणून निघून गेलेल्या चौथीच्या विद्यार्थिनीने आपल्या मैत्रिणीसोबत पळून विरार गाठले. पण नंतर मात्र दोघींनी बुरखाधारी महिलेसह वाहनचालकाने अपहरण केले, अशी कहाणी रचल्याची घटना मीरा रोडमध्ये घडली.**



एका विद्यार्थिनीने दिलेल्या फिर्यादीनुसार, शीतलनगर भागात एका खाजगी शाळेत चौथी इयत्तेत शिकणाऱ्या दोन्ही ११ वर्षांच्या विद्यार्थिनी मैत्रिणी आहेत. बुधवारी सायंकाळी शाळेतून सुटल्या असता होली क्रॉस शाळेसमोरील रस्त्यावर अचानक पांढऱ्या रंगाची गाडी आली. त्यातून एक बुरखाधारी महिला बाहेर आली आणि दोघींना गाडीत बसवले. गाडी चालवणाऱ्यानेही तोंडावर मास्क घातले होते. गाडीची काच बंद असल्याने मदतीसाठी आरडाओरडा करूनही आवाज बाहेर गेला नाही. महिलेने चाकूचा धाक दाखवून ओरडणे बंद करण्याचा दम दिला. त्यामुळे दोघींनी ओरडणे बंद केले.

गाडी बरीच पुढे गेली असता संधी साधून एकीने महिलेच्या हाताचा चावा घेतला. तर, दुसरीने गाडीचे दार उघडत दोघी धावल्या. चालकाने पाठलाग केला, परंतु वर्दळ असल्याने तो मागे फिरला. दोघींनी तेथे असलेल्या सरबतविक्रेत्यास विचारणा केली असता त्या विरार पश्चिमेला असल्याचे कळले. सरबतवाल्याकडून मोबाइल घेऊन आईला फोन केला व घडलेला प्रकार सांगितला.

विरार पोलीस ठाण्यात फिर्यादीसाठी गेल्यावर तेथील पोलिसांनी त्यांना नयानगर पोलीस ठाण्यात जाण्यास सांगितले. गुरुवारी मुलीच्या फिर्यादीनंतर नयानगर पोलिसांनी बुरखाधारी महिला व चालकाविरोधात गुन्हा दाखल केला.

दरम्यान, पोलीस तपासात मात्र अपहरणाचा बनाव असल्याचे निष्पन्न झाले. शाळेत दिलेला अभ्यास झाला नसल्याने घरचे मारतील, या भीतीने दोघींनी शाळा सुटल्यावर थेट विरार गाठले.

विरारला त्या लोकलने गेल्याचा संशय आहे. विरार पश्चिमेस सरबतविक्रेत्यास या दोघी मुली दिसल्याने त्याने दोघींची विचारपूस केली. दोघी मुली मीरा रोडच्या असल्याचे कळल्याने त्याने एकीकडून तिच्या आईचा मोबाइल क्रमांक घेऊन दोघी मुली विरारला आपल्याकडे सुखरूप असल्याचे कळविले.

### तपासात खरे झाले उघड

घरचे मारतील म्हणून या दोघींनी अपहरणाची कहाणी रचली असल्याची माहिती सहायक निरीक्षक सुभाष ठाकूर यांनी दिली. मुलींनी आधी अपहरणाची माहिती दिल्याने त्यानुसार गुन्हा दाखल केला होता. पण, तपासात मुलींनी नेमका प्रकार सांगितला. मुली मिळाल्याचे कळताच पालकांनी सुटकेचा निश्वास टाकला. तेही कहाणीने चक्रावून गेले.

# अबब ! तब्बल १२६ वीजचोर पकडले, धानिवबाग, वाकणपाडा परिसरात कारवाई

**नालासोपारा :** वसई तालुक्यात गेल्या कित्येक वर्षांपासून वीजचोरी करणाऱ्या टोळ्या सक्रिय असून रात्रीच्या सुमारास वीज खांबावर आकडा टाकून वीजचोरी केली जाते. अनेक तक्रारींनंतर महावितरणच्या भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांनी नालासोपारा शहरातील धानिवबाग आणि वाकणपाडा परिसरात धाडी टाकून वीजचोरीचा पर्दाफाश करत तब्बल १२६ जणांविरु द्ध सोमवारी वसई पोलीस ठाण्यात ३ वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत.



या वीजचोरांवर नियंत्रण आणण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी महावितरणच्या उच्च अधिकाऱ्यांनी भरारी पथक तयार करून त्या पथकाद्वारे कारवाई करण्यासाठी सुरुवात केली आहे. नालासोपारा पूर्वेकडील धानिवबाग आणि वाकणपाडा या परिसरातील चाळींमध्ये काळ्या रंगाच्या दोन छेडा असलेल्या सुमारे १० ते ३० मीटर लांबीच्या वायरने चाळीच्या किंवा त्यांच्या परिसरातून जाणाऱ्या इनकमिंग वायरवर टेप करून टेपिंग पद्धतीने विनामीटर आपल्या घर किंवा कार्यालयातील विद्युत उपकरणांना जोडून महावितरणची वीजचोरी केली जात असल्याचे या पथकाच्या निदर्शनास आले. या प्रकरणी अधिकारी निकुंज बाबूलाल वैष्णव (३२) यांनी ३ तक्र ारी देत १२६ जणांवर वसई पोलीस ठाण्यात सोमवारी ३ वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. या १२६ वीज चोरणाऱ्या आरोपींनी ७७ हजार ९२० युनिटची वीजचोरी करून तब्बल १८ लाख ८५ हजार ५४२ रुपयांचे महावितरणचे नुकसान केले आहे.

***नालासोपारामध्ये सर्वात जास्त होते वीजचोरी***

वसई तालुक्यात सर्वात जास्त वीजचोरी नालासोपारा पूर्वेकडील संतोष भवन, गावराई पाडा, वालई पाडा, मोरेगाव, नागिनदास पाडा, आचोळे डोंगरी, विरार पूर्वेकडे कातकरी पाडा, चंदनसार, मनवेलपाडा, कारगिल नगर, वसई पूर्वेकडे भोयदा पाडा, नवजीवन, सातीवली, वालीव तर नायगांव पूर्वेकडील जुचंद्र, टाकी पाडा या विभागात होते. या विभागात अनधिकृत बांधकामे मोठ्या जोमाने सुरु असल्यामुळे चोरीची वीज वापरण्यास देतात.

# नालासोपाऱ्यातील शेकडो इमारती तहानलेल्या

**विरार –** मुबलक पाणी असल्याचा दावा वसई-विरार महापालिकेकडून केला जात असताना नालासोपारा परिसरातील शेकडो इमारती आजही तहानलेल्या आहेत. पाण्यासाठी त्यांना महिन्याला हजारो रुपये खर्च करून आपली तहान भागवावी लागत आहे. विकतचे पाणी घ्यावे लागत असल्याने या परिसरात टँकरमाफियाही आपले पाय रोवत आहेत.

नालासोपारा पूर्वेतील प्रगतीनगर परिसरात शेकडो इमारती गेल्या १० वर्षांत उभ्या राहिल्या आहेत. या इमारती वसवताना महापालिकेने कानाडोळा केला. आता या इमारतींमध्ये लाखो रुपये खर्च करून अनेकांनी घरे घेतली, तर महापालिकेकडून पाणीपुरवठा सुरू करण्यात येईल, असे आश्वासन विकासकांनी दिले. पण आता तब्बल १० वर्षांचा काळ उलटला; परंतु एकाही इमारतीला महापालिकेची नळजोडणी मिळालेली नाही. उलट १० वर्षांपासून त्यांना टँकरने पाणीपुरवठा करून विकासक आणि टँकरमाफिया यांनी मोठी माया जमवली आहे. या परिसरात पाण्यासाठी मासिक ८०० ते १००० रुपये विकासक प्रत्येक घरातून घेत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.



प्रगतीनगर परिसरात ४५०० मतदार आहेत. पण प्रत्येक निवडणुकीत त्यांना पाण्याचे आश्वासन देऊन मते पदरात पडून घेण्याचे काम राजकीय पुढारी करत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. सुमारे १० हजारांहून अधिक लोकवस्तीचा हा परिसर आजही आपली तहान टँकरच्या पाण्यावर भागवत आहेत. टँकरद्वारे केला जाणारा पाणीपुरवठा पिण्यास योग्य नसल्याने या परिसरातील नागरिकांना आरोग्याचे प्रश्न सतावत आहेत. असे असतानाही वसई विरार महापालिका या नागरिकांना पाण्याची व्यवस्था करून देत नाही. काही ठिकाणी सार्वजनिक पाण्याचे नळ जोडण्यात आले आहेत, पण त्यावर पाणी मिळण्यासाठी अनेक तास रांगेत उभे राहावे लागते, असे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. या परिसराला लवकरच नळजोडणी दिली जाणार आहे, अशी माहिती महापालिकेचे सहायक आयुक्त विजय चव्हाण यांनी दिली.

# महिना उलटला तरी पालिका आयुक्त मिळेना!

## *वसई-विरार शहर महानगरपालिकेचा कारभार रामभरोसे*

**वसई : मुंबईजवळ असलेल्या व 'तिसरी मुंबई' समजल्या जाणाऱ्या पालघर जिल्ह्यातील एकमेव वसई-विरार महापालिकेचा कारभार गेल्या एक महिन्यापासून आयुक्तांविनाच सुरू आहे. तत्कालीन आयुक्तांनी राजीनामा दिल्यानंतर नवीन आयुक्तांच्या नियुक्तीची प्रतीक्षा वसई-विरारचे रहिवासी करीत आहेत. आयुक्तांप्रमाणेच उपायुक्तही नसल्यामुळे या महापालिकेचा कारभार रामभरोसे सुरू आहे.**

राज्य शासनाने वसई-विरार महापालिका प्रशासनाचा प्रभार पालघर जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांच्याकडे सोपवलेला आहे. असे असले तरी सद्यस्थितीत महापालिकेत एका अतिरिक्त आयुक्तांवरच कारभाराचा ताण मागील महिनाभरापासून येत आहे. याचा सर्वाधिक फटका पालिका नगरसेवकांसह करदाते नागरिक, राजकीय नेते, समाजसेवक यांच्याबरोबरच दैनंदिन प्रकल्प, निविदा मंजुरी, योजना तसेच उचित करावयाच्या कारवाईला बसू लागला आहे. दरम्यान, नुकतीच पालघर जिल्हा परिषद निवडणूक संपली. खरे तर नवीन आयुक्तांची नियुक्ती त्याच वेळी होणे गरजेचे होते. परंतु आज आचारसंहिता व निवडणूक संपून देखील पंधरा दिवसांचा काळ लोटला आहे. राज्य सरकारकडून वसई-विरार महापालिकेसाठी नव्या आयुक्तांच्या निवडीला विलंब का लागत आहे, असे सवाल केले जात आहेत. शिवसेना व बहुजन विकास आघाडी यांच्यात एकमत होत नसल्यानेच वसई-विरार महापालिकेच्या नव्या आयुक्त निवडीला विलंब होत असल्याचीही चर्चा सुरू आहे. वसई-विरार शहर महापालिका सध्या अनेक कारणांनी गाजत असले तरी आयुक्तांची नेमणूक न झाल्याने यात काही राजकारण आहे की काय? अशीही चर्चा सुरू असून शासनाने तत्काळ आयुक्त व उपायुक्तांची नियुक्ती करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

एकाच अतिरिक्त आयुक्तावर मदार! : पालिकेत दोन अतिरिक्त आयुक्त कार्यरत असले तरी त्यातील एक अतिरिक्त आयुक्त पुणे येथे प्रशिक्षणासाठी गेले आहेत. त्यामुळे एका अतिरिक्त आयुक्तावर महापालिकेच्या कारभाराचा ताण आहे. दुसरीकडे पालिकेतील एकमेव उपायुक्त असलेले किशोर गवस यांची मंत्रालयात बदली झाल्याने आता पालिकेत एकही उपायुक्त राहिलेला नाही. त्यामुळे इथे अनेक महत्त्वाची कामे रखडली आहेत. एकूणच महापालिकेचा कारभार लिपिक तथा ठरावाच्या आधारे सहाय्यक आयुक्त झालेल्या कर्मचारी-अधिकारी वर्गाकडून करून घेतला जात आहे.

***प्रशासनात एकही उपायुक्त नाही, मंजुरीनुसार १४ उपायुक्तांची गरज!***

वसई-विरार महापालिकेत प्रत्यक्षात एकूण मंजुरीनुसार १४ उपायुक्तांची गरज आहे. मात्र केवळ एकच उपायुक्त पालिकेचे काम पाहत होते, परंतु आता तेही बदली होऊन मंत्रालयात गेल्याने महापालिकेत एकही उपायुक्त नाही. म्हणजेच आयुक्तही नाही व उपायुक्त देखील नाही. त्यामुळे पालिकेची सर्व मदार आता पालिका प्रभारी सहाय्यक आयुक्तांवरच राहिली असून त्याचा सर्वाधिक फटका रोजच्या कामकाजाला बसतो आहे. येत्या तीन ते चार महिन्यात पालिकेच्या पंचवार्षिक निवडणुका असल्याने सध्या आयुक्त न देता जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पालिकेवर वचक ठेवण्याचे काम शिवसेना करत असल्याची टीका विरोधक करत आहेत. आगामी निवडणुकीपूर्वी या ठिकाणी राजकारणाला सुरुवात झाल्याची चर्चा सुरू आहे.

# बाजारात हापूस अवतरला !

## एक पेटी १०रुपये

**नवी मुंबई -** वाशीतील घाऊक फळ बाजारात गुरुवारी कोकणातील हापूस आंब्याचे आगमन झाले. त्यामुळे बाजारात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बाजारातील माजी संचालक संजय पानसरे यांच्याकडे हापूस आंब्याच्या पाच डझनाच्या पाच पेट्या दाखल झाल्या आहेत. आंब्याच्या पाच डझनांच्या एका पेटीला तब्बल दहा हजारांचा दर मिळाला आहे.



यावर्षी सर्वच ठिकाणच्या आंब्याचा हंगाम दोन महिन्यांनी लांबला आहे. त्यामुळे सर्वांनाच हापूसची प्रतीक्षा होती. दरवर्षी डिसेंबरमध्ये होणारी हापूस आंब्याची दोन ते चार पेट्यांची आवक यावेळी उशिरा सुरू झाली.

यावर्षी लांबलेल्या पावसामुळे ऑक्टोबरमध्ये येणारा आंब्याचा मोहोर आलाच नाही. त्यानंतर आवश्यक ती थंडी पडली नाही. त्यामुळे आंब्याला मोहोर धरला नाही. दिवाळीनंतरही पाऊस थांबल्यावर डिसेंबरच्या सुरुवातीला धरलेला मोहोर काही शेतकऱ्यांनी टिकवून ठेवला. त्यातून लागलेले आंबे आत्ता बाजारात आले आहेत.

## सातव्या राष्ट्रीय तांग सुडो स्पर्धेत स्पोर्ट्स इंडिया कराटे अकॅडमी (मीरा-भाईंदर जिल्हा) यांची दमदार कामगिरी



नाशिक दि. २६ (प्रतिनिधी) : आय टी एफ तांग सु डो फेडेरेशन ऑफ इंडिया तर्फे सातवी राष्ट्रीय तांग सु डो स्पर्धा दिनांक २४ ते २६ जानेवारी २०२० रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत १७ राज्यातील ४५० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत स्पोर्ट्स इंडिया कराटे अकॅडमी (मीरा भाईंदर जिल्हा) च्या स्पर्धकांनी १४ गोल्ड, १३ सिल्वर आणि १५ कांस्य पदकं पटकावली.

कु. समर्थ वैभव तांबे याचा पदमश्री आणि अर्जुन पुरस्कार विजेते श्री सतपाल सिंग यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कस्तुरी सावंत-भोसले (२ गोल्ड), शुविधा कदम (२ सिल्वर), शुशांक कदम (२ कांस्य) , करण पवार ( ३ सिल्वर), गौरव सावंत-भोसले (३ सिल्वर १ कांस्य ), शिवदिन यादव (१ गोल्ड २ सिल्वर) यांनी विशेष कामगिरी केली. सर्व स्पर्धकांची प्रशिक्षक श्री विनोद कदम सर (४ डिग्री ब्लॅक बेल्ट इंटरनॅशनल तांग सु डो फेडेरेशन USA) यांनी उत्तम तयारी करून घेतली होती. आश्रय ट्रस्टचे संस्थापक श्री दीपक नाईक यांनी सर्व स्पर्धकांचे अभिनंदन करून पुढील भविष्यासाठी शूभेच्छा दिल्या.


## वीज मीटर प्रीपेड होणार
### रिचार्ज केले तरच घरात वीज दिसणार



**नवी दिल्लीः वीज चोरी रोखण्यासाठी देशभरात १ एप्रिलपासून प्रत्येक घराला वीजेचे प्रीपेड मीटर लावणे बंधनकारक करण्यात येणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज बजेटमध्ये याची माहिती दिली. केंद्र सरकारने यासाठी २०२२ चे लक्ष्य ठेवले आहे. त्यानंतर वीज हवी असल्यास रिचार्ज करावे लागणार आहे. जर रिचार्ज केले नाही तर घरात वीज पुरवठा होणार नाही. मोबाइल फोन प्रमाणे आता वीजेच्या मीटरला रिचार्ज करावे लागणार आहे.**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन लोकसभेत अर्थसंकल्प मांडत आहेत. मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील हा दुसरा अर्थसंकल्प आहे. येत्या दोन वर्षात घरातील सर्व मीटर प्री पेड करण्यात येणार आहेत. टप्प्याटप्प्याने जुने मीटर हटवण्यात येणार आहेत. स्मार्ट मीटरमधून वीज सप्लाय करण्यात येणार असून यात वीजेचा दर निवडण्याचा पर्याय असणार आहे. यासाठी २२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती निर्मला सीतारामन यांनी दिली आहे. यासाठी स्मार्ट प्री पेड मीटरचे उत्पादन वाढवण्याची सूचना देण्यात आली आहे. येत्या काही दिवसात याची मागणी वाढणार असल्याने याआधीच प्रीपेड मीटर बनवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

प्रीपेड वीज मीटर आल्यास ग्राहकांना वीज मीटरचे बील पाठवणे बंद होणार आहे. वीज कंपन्यांचा यावर होणारा खर्च कमी होणार आहे. घरात प्रीपेड वीज मीटर लावणे बंधनकारक करण्याचा विचार सुरू आहे. या नव्या धोरणामुळे वीज क्षेत्रात क्रांती घडणार आहे. वीज कंपन्याचे नुकसान कमी होणार असून वीज वितरण कंपन्यांना फायदा होणार आहे. बाजारात प्रीपेड वीज मीटर आले असून सर्वसाधारण वीज मीटरची किंमत ८ हजार रुपये आहे. तर चांगल्या दर्जाच्या वीज मीटरची किंमत २५ हजार रुपये इतकी आहे. मोबाइल फोनवरून वीज मीटर रिचार्ज करता येणार आहे.



## जळगावहून अमळनेरला आरोपी घेऊन जाणाऱ्या वाहनाला अपघात

**अमळनेर** - जळगावहून अमळनेर येथे आरोपीना घेऊन जाणारी व्हॅन धरणगावातील पिंप्री गावाजवळ पलटी झाल्याची घटना आज दुपारी येथे घडली असून यात १२ जण जखमी झाले असून काही गंभीर दुखापत झाली असल्याचे कळते. पोलीस व्हॅन (क्र. एमएच -१९ -०५४५) हि जळगाव येथून अमळनेर येथे जात असताना व्हॅन पिंप्रीखुर्द येथे पलटी झाल्याने यात १२ जण जखमी झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. गंभीर जखमींना जळगाव येथे जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

## पालघर तालुक्यात आश्रय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्टच्या वतीने राबवण्यात आली 'कपडे वाटप' मोहिम





दिनांक ३१.०१.२०२० रोजी पालघर जिल्हातील बोईसर महागाव कुकडे या ग्रामीण भागात विटभट्टीवर काम करणारे तसेच जंगलात जाऊन लाकडे गोळा करणारे असे अनेक गरिब आदिवासी कुंटूबाला आश्रय ट्रस्ट चे संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक तसेच सचिव सौ. प्रिती दिपक नाईक व सहकारी यांच्यावतीने अतिशय दुर्गम भागात जाऊन गोरगरिबांना कपडयाचे वाटप करण्यात आले.

पृष्ठ १ वरुन

## महाराष्ट्रातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यामागे ठाणे ग्रामीण पोलीस अग्रेसर



वाहतुकीचे नियम व घ्यायची खबरदारी याबाबत माहितीपर फलक , पत्रके , पुस्तिकांद्वारे जनजागृती केली. विद्यार्थ्यांची नेआण करणाऱ्या शाळांच्या बसचालकांना मार्गदर्शन केले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई केली , अशी माहिती ठाणे ग्रामीणचे वाहतूकपोलीस निरिक्षकअनिल पवार यांनी दिली.

या अभियानाचा समारोप मिरा रोडच्या जीसीसी क्लबमध्ये झाला. यावेळी डॉ. शिवाजी राठोड म्हणाले की, वाढते रस्ते अपघात व त्यातून होणारे मृत्यु व अपंगत्व चिंताजनक आहे. त्यामुळे आपण स्वतःहून वाहतुकीची शिस्त लावून घेतली पाहिजे. आपल्या कुटुंबात , मुलांमध्ये जागरुकता आणली पाहिजे.

अपघातात एकाचा मृत्यु होणे वा अपंगत्व येणे यामुळे संपुर्ण कुटुंब भरडले जात असते. अपघात घडला की , मग आपणास बचावाची संधी मिळत नाही . त्यामुळे वाहतुकीच्या आणि सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोर पालन आपण केले पाहिजे , असे आवाहन त्यांनी केले.

मद्यपान करुन वाहन चालवू नका, सीटबेल्ट लावा, वेगाची मर्यादा पाळा , बेदरकारपणे वाहन चालवू नका , ओव्हरटेकचा नाद सोडा , अल्पवयीन मुलांच्या हाती वाहन देऊ नका , सिग्नल वाहतुक नियम पाळा आदी सुचना त्यांनी केल्या.

यावेळी अपर पोलीस अधिक्षक संजयकुमार पाटील , उपनिरीक्षक शांताराम वळवी व शशिकांत भोसले , पोलीस ठाण्यांचे प्रभारी उपस्थित होते. या अभियानात जनजागृती व विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घेणाऱ्या संस्था , सामाजिक कार्यकर्ते , नागरिकांसह विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अनेक सेवाभावी संस्थानी विविध कार्यक्रम राबवल्यामुळे ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ. शिवाजी राठोड यांच्या हस्ते सर्व संस्थेच्या संस्थापकांचा गौरव करण्यात आला. सदरप्रसंगी आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टचे संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांना रस्ता सुरक्षा अभियानाकरता वाहतुक जनजागृती कार्यक्रमात मोलाचे सहकार्यबद्दल प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

## चमकदार कामगिरीसाठी राज्यपालांचे एनसीसी ला ५०००० रुपयांचे बक्षीस

पृष्ठ १ वरुन





**राजभवन येथे रविवारी (दि. २) स्वागत समारंभ आयोजित केला होता त्यावेळी राज्यपालांनी सदर पुरस्काराची घोषणा केली. राज्य एनसीसीला यंदा पंतप्रधान निशाण स्पर्धेत दिवितीय सर्वोत्तम संचालनालयाचा पुरस्कार प्राप्त झाला. यावेळी राज्य एनसीसीचे प्रभारी अतिरिक्त महासंचालक ब्रिगेडियर राजेंद्र सिंह धैला, विंग कमांडर विक्रम त्यागरामन तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.**

## अंधेरी साईवाडी येथे ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा संपन्न







आश्रय ट्रस्ट संलग्न सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशनच्या वतीने साईवाडी अंधेरी येथे मागील पाच वर्षा पासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी स्थानिक जेष्ठ नागरिकांचा सन्मान विविध क्षेत्रातील नामवंत मंडळींच्या हस्ते करण्यात येतात. यावेळी प्रमुख पाहूणे अंधेरी पोलीस ठाण्याचे प्रकाश बंडगर उपस्थित होते. या सोहळयाचे नियोजन संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाने संस्थेचे उपसचिव संतोष चौधर हे करतात. व याचे अतिशय चांगले नियोजन संतोष चौधर यांच्या वतीने प्रत्येक महिन्याला करण्यात येते. अंधेरी कमिटीचे अध्यक्ष तुकाबाई चौधर यांच्यामार्फत जेष्ठ नागरिकांना अल्पोहाराची व्यवस्था विविध दानशूर व्यक्तींच्या मदतीने करण्यात येते. जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राच्या वंचित असलेल्या नागरिकांना एकत्र आणण्याचे काम जेष्ठ पत्रकार अनंत दाभोळकर ,पंढरीनाथ खंडागळे (निवृत्त पोलीस ऑफीसर) , किसन शेवाळे , वासुदेव पाष्टे , उदय देशमुख , काशिराम मांडवकर , महादेव पारदळे, राजराम चव्हाण , शशिकांत बंड , दिलीप प्रभु , दिपकमहाडिक, हरिश्चंद्र रेवाळे इत्यादी मंडळी करीत आहेत. इमरतीच्या आवारात या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. ८०० ते ९०० सदस्य असलेल्या या संस्थेला अजुनही विरंगुळा केंद्रासाठी सरकारने जागा उपलब्ध करुन दिली नाही याबद्दल खेद वाटतो.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)